# उमरेड तालूक्याच्या ग्रामीण समुदायातील धर्मांतरित बौध्द समुदायाची शैक्षणिक स्थिती

**डॉ.रमेश एम. घोनमोडे**
*समाजशास्त्र विभागप्रमुख*
*नूतन आदर्श महा. उमरेड*

***सारांशः***
*पती–पत्नी हे संसार रथाचे दोन चाके मानले जातात. त्यामुळे पुरक व समान असणे आवश्यक आहे. अन्यथा संसारी जीवन यशस्वी होत नाही. त्यामुळे विवाहासाठी जोडीदार निवडीचा प्रथम आधार कोणता हे जाणण्याचा प्रयत्न केला असता धर्मांतरीत समुदायात वधू–वर निवडीसाठी सर्वात प्रथम प्राधान्य शिक्षणाला दिला जातो. 86 (28.67%) उत्तरदात्याचे मत आहे व त्यापाठोपाठ नौकरीस 72 (24.00% तर 58 (19.33%) उत्तरदात्यांनी सौंदर्याला महत्व दिले आहे. यावरून असा निष्कर्ष निघतो की, विवाहासाठी जोडीदार निवडतांना बौध्द धम्मात सर्वात जास्त महत्व शिक्षणाला दिले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना सामाजीक व आर्थिक विषमता दूर करण्यासाठी एक महत्वपुर्ण मार्ग वाटत होता तो म्हणजेच शिक्षण होय. बौध्द धम्मात शिक्षणाला विशेष महत्व दिले जाते.*

**प्रस्तावनाः**

शिक्षणाला जसे एक साध्य मानले जाते तसेच त्यांच्याकडे अन्य हितावह साध्य गाठण्याचे एक साधन म्हणूनही पाहिले जाते. शिक्षणामुळे व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा व संयुक्तपणे विचार करण्याच्या बौद्विक शक्तीचा विकास होतो. आर्थिक, राजकीय, त्याचप्रमाणे सांस्कृतिक कार्य पार पाडण्याची पात्रता त्यांच्या अंगी येते आणि तदनुषंगाने त्याचा सामाजिक, आर्थिक दर्जा वाढण्यास देखील मदत होते. समाजात बदल व विकास घडवून आणणे, इतर उद्दिष्ट गाठण्याचे एक प्रमुख साधन म्हणून शिक्षणाचा वापर करता येता हे आता सिध्द झाले आहे. शिक्षणामुळे उर्ध्वगामी गतिशिलतेला वाव मिळाला आणि त्यानुसार विविध सामाजीक स्तरातील माणसाच्या दर्जामध्ये समानता प्रस्थापित करण्यास मदत होते. मानवी हक्काविषयी केलेल्या जागतिक ठरावानुसार शिक्षण मिळणे हा प्रत्येक मानवाचा मुलभुत हक्कच मानला गेला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, "शिक्षण हा सर्वात महत्तवाचा भौतिक लाभ आहे." त्याकरीता आम्ही तिव्र संघर्षासाठी तयार आहोत. त्यासाठी आम्ही कोणत्याही प्रकारच्या भौतिक लाभाचा त्याग करू शकतो. या संस्कृतिन उपलब्ध करून दिलेल्या प्रत्येक लाभाचा त्याग करावयाची आमची तयारी आहे. पण कोणत्याही परिस्थितीत उच्च शिक्षणाचा अधिकार आणि संधी या प्रश्नाचे एवढे महत्तव आहे. त्याना आता जाणवले आहे की, शिक्षणाशिवाय त्यांचे अस्तित्व सुरक्षित नाही."

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 31 मे 1936 ला मुंबई इलाखा महार परिषदेत धर्मातराबाबत आपली भुमिका स्पष्ट करतांना सांगितल की, "माणूस धर्माकरीता नाही. धर्म माणसाकरिता आहे. जो धर्म तुमच्या माणुसकीला काही किंमत देत नाही. त्या धर्मात तुम्ही का राहता? जो धर्म तुम्हाला शिक्षण घेवू देत नाही त्या धर्मात तुम्ही का राहता? जो धर्म एका वर्गाने विद्या शिकू नये, धनसंचय करू नये, शस्त्र धारण करू नये असे सांगतो, तो धर्म नसून माणसाच्या जीवनाचे विडंबन आहे. जो धर्म अशिक्षितांना अशिक्षित रहा, निर्धनांना निर्धन रहा अशी शिकवण देतो तो धर्म नसून ती शिक्षा आहे." अशा प्रकारे शिक्षणाविषयक विचारांचा आढावा घेण्यात आला. शिक्षणाचे आधुनिक महत्व विषद करण्यात आले.

**उमरेड तहसिलः**

प्राचीन काळाच्या दरम्यान या परिसरात मोठया प्रमाणात उंबराची झाडे होती. कालांतराने या झाडामुळेच या गावाचे नाव उमरेड पडले. उमरेडची तहसिल पूर्वी गिरड होती. कालांतराने सन 1850 मध्ये उमरेड तहसिलची स्थापना झाली. येथे पिंपलडोल पहाडयांच्या श्रृखंलेतून आंब नदीच्या सहाय्यक नदीचा उगम आणि नागनदीच्या सहाय्यक नदीचा उगम स्थान आहे. समुद्रासपाटीपासुन उमरेडची उंची 289.28 मीटर आहे. नागपुरवरून पुर्वेस 45 कि.मी. अंतरावर आहे. या तहसिलीत नांद नदीशिवाय सिमेवरून वेशा नदी वाहते. येथे धान, ज्वारी,कापुस,मुंगफल्ली, सोयाबीन, संत्रा इ.उत्पादन होते. येथे पुर्वी कपूरी पानाचे बगीचे होते. कापसाचा मोठा बाजार होता. कोष्टी समाज जास्त प्रमाणात असल्यामुळे हातमागावर बनलेली रेशमी किनारीचे धोतर व साडया प्रसिध्द होत्या त्याचबरोबर अस्पृश्य महार जातीतील कोसरे ही उपजात पूर्वीश्रमीच्या महार उपजातीत श्रेष्ठ मानली जात होती व त्यांच्या मुख्य व्यवसाय हातमागावर धोतर,साडी, लुगळे व अन्य वस्त्रे विणणे हे होते. ही जात अस्पृश्य असुनही समाजाची वस्त्राची गरज भागवित होती. त्यामुळे तिचा दर्जा इतर अस्पृश्यांच्या तुलनेत वरचढ होता. उमरेड हे नागपुरवरून 45 कि.मी अंतरावर आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लक्ष्मीनगरच्या 14 एकर परिसरात रविवार दि.14 ऑक्टोबर 1956 ला सकाळी 8.15 वाजता अशोक विजयादशमीच्या दिवशी भिक्कु महास्थविर चंद्रमणी यांचाहस्ते दिक्षा घेतली. या सोहळयाने परिसर प्रभावित झाला. त्याचे अनुयायी सुध्दा या परिसरात मोठया प्रमाणात असणे स्वाभाविक आहे. म्हणुनच प्रस्तुत अध्ययनासाठी या क्षेत्राची निवड करण्यात आली.

**उद्देश :**

उमरेड तालुक्याच्या ग्रामीण समुदायातील लोक बौध्द धम्म स्विकाराने किती प्रभावित झाले यांचे अध्ययन करणे.

**गृहितकृत्य :**

बौध्दांच्या शैक्षणिक विकासामुळे पारंपारिक सामाजिक, धार्मीक मुल्ये, प्रमाणकामंध्ये परिवर्तन होत आहे.

**संशोधन आराखडाः**

संशोधनाचा विषय व उद्दिष्टे निश्चित केल्यानंतर संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा प्रमाण करण्यात आला. " विशिष्ट व्यक्तीच्या, समुहाच्या व स्थितीच्या वैशिष्टयांचे वा लक्षणाचे यथातथ्य वर्णन करणे हा वर्णनात्मक अध्ययनाचा हेतू असतो" वर्णनात्मक आराखडयात संशोधनाचे उद्देश, नमुना निवड, तथ्यसंकलनाच्या पध्दती, तथ्याचे संक्रमण, संकेतन इत्यादी पायऱ्याबांबत संशोधकाला अनेक निर्णय घ्यावे लागतात. ग्रामीण समाज, ग्रामीण पुनर्निर्मीणाच्या योजनेमुळे समाज विकासाच्या निरनिराळया योजनामुंळे (चेतन घटकामुळे) परिवर्तन घडून येत आहे काय? त्यासोबतच शिक्षण,दळणवळणाच्या सोयी, आधुनिक तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे या (अचेतन) घटकांमुळेसुध्दा येथील समाजजीवन परिवर्तीत होत आहे काय? त्यातील कुटुंबसंस्था, धर्मसंस्था, जातीव्यवस्था,अर्थव्यवस्था यात काय परिवर्तन झाले? याचे वर्णनात्मक अध्ययन करावयाचे उद्दिष्टे असल्यामुळे वर्णनात्मक संशोधन आराखडयाची निवड केली आहे.

**सारणी क्र.01**

कुटूंबातील सदस्यांची शैक्षणिक स्थिती दर्शक सारणी

| अ. क्र | शिक्षण | मुली | मुले | स्त्री | पुरूष |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शाळापूर्व बालक | 152 | 166 | — | — |
| 2 | निरक्षर | — | — | 199 | 103 |
| 3 | प्राथमिक | 87 | 76 | 250 | 177 |
| 4 | माध्यमिक | 109 | 131 | 167 | 272 |
| 5 | उच्चमाध्यमिक | 67 | 98 | 61 | 122 |
| 6 | स्नातक | 15 | 36 | 7 | 27 |
| 7 | स्नातकोत्तर | 2 | 13 | — | 5 |

वरील सारणीत धर्मांतरीत बौध्द उत्तरदात्यांच्या कुटूंबातील सदस्यांची शैक्षणिक स्थिती दर्शविली आहे. त्यात शिक्षणक्षम वयातील मुला—मुलींमध्ये एकही निरक्षर नाही. उत्तरदात्यांया कुटूंबातील स्त्री—पुरूषांचे शिक्षणाचे प्रमाण दर्शिविले आहे. त्यात स्त्रीयांच्या शिक्षणाचे प्रमाण 71 टक्के तर पुरूषांचे शिक्षणाचे प्रमाण 85 टक्के आहे.2001 च्या जनगणना अहवालानुसार उमरेड तालुक्याचे साक्षरतेचे प्रमाण 78.87 टक्के आहे. तर धर्मांतरीत बौध्द समुदायातील प्रस्तुत अध्ययनाच्या मुलाखतदात्यांच्या कुटूंबातील शिक्षणाचे प्रमाण हे सरासरी 78टक्के एवढे आहे.म्हणजेच जिल्हयाच्या सरासरीपेक्षा जास्त आहे. ही बाब येथे नोंद घेण्यासारखी आहे. साधारणतः शिक्षणाच्या क्षेत्रात ग्रामीण समुदायातील ओ.बी.सी. समाज हा इतर समुदायाच्या तुलनेत मागे पडतो आहे. अशी एक साधार भिती अनेक चिंतकाकडून व्यक्त केली आहे. परंतु धर्मांतरीत बौध्द या समुदायातील शैक्षणिक स्थिती ही चांगलीच नव्हे तर भक्कम आहे. ही बाब वरील सारणीवरून निदर्शनास येते. एवढेच नव्हे तर या शैक्षणिक स्थितीवर उत्तरदाते समाधानी नाहीत तर यापेक्षाही आपल्या धर्मांतरीत बौध्द समाजाचे शिक्षणाचे प्रमाण वरचढ असायला पाहिजे. अशी अपेक्षा उत्तरदाते करतांना दिसून येतात. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा घेतलेला आंबेडकरी समाज निदान शिक्षणात तरी मागे असुनच शकत नाही. यावर उत्तरदात्याची गाढ श्रध्दा आहे.

अशाप्रकारे शुद्र आणि स्त्रियांना शिक्षण देऊ नये., हा जो ब्राम्हणांचा सिध्दांत होता. त्यास बुध्दाने विरोध करून सर्वांना ज्ञान मिळाले पाहिजे, असे स्पष्ट विचार मांडलेत. इतकेच नव्हेत तर कोणत्याही प्रकारचा वर्ण किंवा जातीभेद न मानता बुध्दाने सर्व जातीच्या पुरूषांना आणि स्त्रियांना आपल्या धम्माची दीक्षा दिली होती. ज्ञानाची प्रत्येक व्यक्तीला आवश्यकता आहे.म्हणून प्रत्येक व्यक्तीला ज्ञान घेण्याचा हक्क आहे. शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे. शिक्षण ही एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी नाही. अशा प्रकारचा विचार प्राचीन काळात भगवान बुध्दाने मांडला होता. त्यामुळे प्रत्येक भिक्खू हा ज्ञानी आणि प्रज्ञावंत असायचा. भिक्खु उपासकांना अनौपचारिक पध्दतीने शिक्षण दयायचे. ज्या काळात जगात मोठमोठी विद्यापीठे अस्तित्वात नव्हती. त्या काळात बौध्द भिक्खुंनी जागतिक कीर्तीची मोठमोठी विद्यापीठ निर्माण केली होती. तक्षशिला (पाकिस्थान) नालंदा (बिहार) नागार्जुन (आंधप्रदेश), विक्रमशीला, उदंतपुरी, रत्नागिरी ;ओरिसा) इत्यादी मोठमोठी विद्यापीठे बौध्द संस्कृतीमधून उदयास आली होती. तक्षशिला आणि नालंदा या विद्यापीठात चीन, श्रीलंका इत्यादी देशातील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी वायचे. जगात विद्यापीठ शिक्षणाची परंपरा बौध्द धम्मातून निर्माण झाली. यावरून हे स्पष्ट होते की, बौध्द धम्माने अनौपचारिक आणि औपचारिक पध्दतीने शिक्षण देण्याचे कार्य केले. शिक्षणाचा प्रसार करण्यामध्ये बौध्द धम्माचे विशेष योगदान आहे.

**सारणी क.02 क्र**

कुटूंबातील सदस्यांनी जास्त शिक्षण न घेण्याची कारणे दर्शक सारणी

| अ. क्र | जास्त शिक्षण न घेण्याची कारणे | वारंवारिता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | गरीबी | 36 | 12 |
| 2 | संयुक्त कुटूंब | 12 | 4 |
| 3 | पारंपारिक व्यवसाय | 40 | 13.3 |
| 4 | शैक्षणिक सुविधा उपलब्ध नसणे | 30 | 10 |
| 5 | शिक्षणाचे महत्व माहित नसणे | 16 | 5.3 |
| 6 | नोकरी मिळण्याची हमी नसल्यामुळे | 68 | 22.7 |
| 7 | शिक्षणाची आवड नसणे आणि वारंवार नापास होणे | 48 | 16 |
| 8 | कोणताही पर्याय लागू नाही | 50 | 16.7 |
| | **एकूण** | **300** | **100.0** |

वरिल सारणीत उत्तरदात्यांच्या कुटूंबातील सदस्याचे जास्त शिक्षण न घेण्याची कारणे दर्शविलेले आहेत. त्यातील आात्यांतिक गरीबी हे शिक्षण न घेण्याचे कारण असल्याचे 36(12%) उत्तरदाते मानतात, तर 12(4ः) कुटूंब हे संयुक्त स्वरूपाचे असुन संयुक्त कुटूंबात शिक्षणाला विशेष महत्व न देता कामाच्या विभागणीला व कर्तव्य पालनाला विशेष महत्व दिल्याने जास्त शिक्षण घेता आले नाही. अशी कबुली देतात. ग्रामीण समुदायातील झाडे कुणबी या जातीचा शेती हा पिढयांपिढया कुटूंबामध्ये चालत आलेला व पारंपारिक व्यवसाय आहे आणि त्या पारंपारिक व्यवसायाला औपचारिक शिक्षणाची फार गरज नाही म्हणून जास्त शिक्षण घेता आले नाही असे 40(13. 3%)उत्तरदाते सांगतात. शैक्षणिक सुविधा उपलब्ध नसणे,शिक्षणाचे महत्व माहित नसणे हया कारणांना अनुक्रमे 30 (10%) व 16 (5.3%) उत्तरदाते मानतात. ग्रामीण भागात शिक्षणाचा उदेदश हा केवळ नोकरी मिळविणे हाच आहे असे मानले जाते आणि गावातील सुशिक्षित बेकारांची संख्या पाहिल्यास नोकरी जर मिळत नसेल तर शिकुन काय करायचे असा दृष्टिकोन बाळगणारे 68 (22.7%) उत्तरदाते आहेत आणि ही संख्या सर्वात महत्म अशी आहे. कुटूंबातील वडिलधारी प्रामुख्याने आई–वडिलांनी अपत्यांच्या मनात शिक्षणाविषयी रूची, आवड निर्माण करणे आवश्यक असते. आई–वडिलांनी जर आपल्या मनावर तसे बिंबविले नसेल तर त्यांच्यामध्ये शिक्षणविषयी आवड नसते आणि शिक्षणाची आवड नसेल तर परिक्षेत वारंवार नापास होणे हे ठरलेलेच असते. शिक्षणाची आवड नसणे व वारंवार नापास होणे हेही जास्त शिक्षण न घेण्याचे स्वाभाविक कारण आहे असे 48(16%) उत्तरदात्याचे मत आहे. तर कोणताही पर्याय लागू नाही असे 50 (16.7%) उत्तरदात्यांना वाटते. साधारणतः मानवी स्वभाव हा पूर्णतः कधीच समाधानी नसतो. ही बाबसुध्दा याठिकाणी प्रकर्षाने जाणवते. वास्तविक पाहता जिल्हयाच्या व राज्याच्या सरासरी साक्षरतेबरोबर संशोधन विश्वातील या धर्मातरीत बौध्द समुदायातील लोकांचे शिक्षण हे सप्रमाण व सरस आहे. परंतु असे असले तरी या शैक्षणिक प्रमाणावर उत्तरदाते समाधानी नाहीत. अर्थात एवढयावरच त्यांची शैक्षणिक लालसा तृप्त होत नाही. ही बाब निश्चितच सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने झेपावणारी आहे.

शर्मा लिहितात की, "व्यक्ती स्वतःचा आणि आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करू शकत नाही. तसेच कुटूंबाच्या सर्व साधारण गरजा पूर्ण करू शकत नाही असे शिक्षण मग ते कितीही आध्यात्मिक असले तरी व्यर्थ आहे. अर्थात त्यात जिविकोपार्जन शिक्षण आवश्यक आहे." हीच सुप्त अभिलाषा शिक्षणाच्या संदर्भात उत्तरदात्यांच्याही मनात असल्याचे निदर्शनास येते.

**सारणी क्र.03**

**शिक्षणामुळे बदलाची स्थिती दर्शक सारणी**

| अ. क्र | बदलाची स्थिती दर्शक विधाने | एकूण | सहमत | शे.प्र. | तटस्थ | शे.प्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | शिक्षणामुळे खऱ्या अर्थाने व्यक्तीचा विकास होतो. | 300 | 300 | 100 | – | – |
| 2 | शिक्षणामुळे व्यक्तीला मोठया नोकऱ्या मिळतात. | 300 | 266 | 88.8 | 34 | 11.3 |
| 3 | शिक्षणामुळे समाजात प्रतिष्ठा वाढते. | 300 | 296 | 98.7 | 04 | 1.3 |
| 4 | शिक्षणामुळे पारंपारिक पोशाखात व व्यावसायात बदल होतो. | 300 | 268 | 89.3 | 32 | 10.7 |
| 5 | शिक्षणामुळे जाती द्वेषाची भावना नष्ट होते. | 300 | 264 | 88 | 36 | 12 |
| 6 | शिक्षणामुळे धार्मिक रूढी, मूल्ये प्रमाणकांमध्ये बदल होतो. | 300 | 271 | 90.3 | 29 | 9.7 |
| 7 | शिक्षणामुळे गतिशिलता वाढते | 300 | 300 | 100 | – | – |
| 8 | शिक्षणामुळे आचार आणि विचारात बदल होतो. | 300 | 300 | 100 | – | – |
| 9 | शिक्षणामुळे अज्ञान,अंधःश्रध्दा नष्ट होते. | 300 | 253 | 84.3 | 47 | 15.7 |

शिक्षणामुळे सामाजिक परिवर्तन निःसंकोचपणे घडून येते हे निर्विवाद सत्य असले तरी या बाबतच्या प्रतिक्रिया वरील विधानांच्या मार्फतीने संशोधन कर्त्याने जाणून घेण्याचा प्रयत्न केला. उत्तरदात्यांच्या वारंवारितेवरून व त्यांच्यासमोर ठेवलेल्या बदलाची स्थितीदर्शक विधानावरून त्यांच्या दृष्टीने असलेले शिक्षणाचे महत्तव संशोधन कर्त्याला जाणून घेता आले. शिक्षणामुळे खऱ्या अर्थाने व्यक्तीचा विकास होतो हया बदलाची स्थिती दर्शविणाऱ्या विधानास सर्व उत्तरदात्यांनी सहमती दर्शविली अर्थात व्यक्तीमधील सुप्त गुणवैशिष्टांचा विकास घडवून आणणारे शिक्षण हे प्रभावी साधन आहे. उच्च शिक्षण घेतल्यास व्यक्तीला मोठया नोकऱ्यासुध्दा मिळतात हयावर उत्तरदात्यांची श्रध्दा आहे. शिक्षणामुळे समाजात मान सन्मान प्राप्त होते. व्यक्तीची प्रतिष्ठा उंचावते. परंपरागत व्यवसाय,पारंपारिक पोशाष,पारंपारिक सामाजिक, धार्मिक रूढी, मुल्ये–प्रमाणकांमध्ये सुध्दा बदल घडून येण्यास शिक्षण जबाबदार आहे हे महत्तम उत्तरदात्यांच्या प्रतिसादावरून लक्षात येते. शिक्षणामुळे गतिशिलता वाढते, जाती–जमातीमधील अंतर कमी होण्यास मदत होते एवढेच नव्हे तर जातीद्वेषाची भावना नष्ट होते. आचार–विचारात बदल घडून येतो इतकेच काय अज्ञान, अंधश्रध्दा नष्ट होण्यास शिक्षण उपकारक ठरते. बौध्दांच्या शैक्षणिक

विकासामुळे पारंपारिक, सामाजिक, धार्मिक मूल्ये प्रमाणकांमध्ये परिवर्तन होत आहे. हे गृहितकृत्ये संशोधन कर्त्याने संशोधन कार्य हातात घेण्यापूर्वी गृहित धरले होते. वरील सारणीतील उत्तरदात्यांच्या प्रतिसादावरून हे गृहित कृत्ये सिध्द झाले असे निदर्शनास येते. डॉ.आंबेडकरांचा आदर्श ठेवुन, त्यांच्या विचारानुसार आणि बौध्द धम्माच्या तत्वानुसार चालण्याचा आटोकाट प्रयत्न बौध्द समाज करीत असल्याचे आढळून येते. डॉ. आंबेडकरांनी सांगितले होते की, "शिक्षणाशिवाय मान्याच्या जागा काबीज करता येणार नाहीत तोपर्यंत खरीखुरी सत्ता आपल्या हाती आली असे म्हणता येणार नाही." डॉ.आंबेडकराचा हा विचार बौध्दांनी आपल्या हदयात कोरून ठेवला आहे. बौध्द पालकांनी आपल्या मुलांनादेखील डॉ. आंबेडकररांच्या या विचारांची वारंवार आठवण करून दिली.

शिक्षण तर घ्यायचे, परंतु त्या शिक्षणाच्या माध्यमातून आपणास शासकीय सेवेतील उच्च जागा प्राप्त करायच्या आहेत. हा विचार बौध्द विद्यार्थ्यांने स्वीकारला उच्च जागा आपणास सहज प्राप्त होणार नाही. त्याकरीता आपणास खूप अभ्यास करायचा आहे. आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करायचा आहे., अशी खूणगाठ मनाशी बांधून बौध्द विद्यार्थी त्यादृष्टीने प्रयत्न करू लागलेत. आधुनिक काळात शिक्षणाचे महत्व जेवढे अधिक विषद केले तेवढे कमीच आहे. बदलत्या परिस्थितीशी समायोजन व विकास साधण्यासाठी जनता शिक्षित असणे अतिशय गरजेचे आहे. साक्षरता हे व्यक्ति विकासाचे साधन आहे हे खरे पण व्यवसायिक व आर्थिक विकासाला हातभार न लावणाऱ्या समाजशिक्षणाला प्रतिसाद ग्रामवासियांच्याकडून मिळणे अवघड आहे. म्हणूनच त्यांना नागरिकत्वाचे शिक्षण, आपले हक्क व कर्तव्य ग्रामीण पुनर्रचनसाठी क्रियाशिल घटक होण्याचे महत्व, स्वतःचा बौध्दिक विकास, नविन व्यवसाय,नविन विचार, नविन तंत्रे यांची ओळख इत्यादी बाबींची माहिती समाजशिक्षणात अभिप्रेत आहे. "म्हणुनच मुदलीयार आयोगाने म्हटले होते की," देशात सर्वात मोठी संपत्ती भूगर्भात नसुन ती लोकांच्या हुशारीत व कौशल्यात आहे म्हणजेच व्यक्तीचा सर्वांगीण विकास करणारे, व्यक्तीच्या सुप्त शक्ती विकसीत करणारी प्रक्रिया म्हणजे शिक्षण होय."

### स्त्री शिक्षणः

बौध्दांनी स्त्री शिक्षणाचे महत्व ओळखले. मुलांप्रमाणेच मुलींना शिक्षण दिले पाहिजे असे त्यांचे मत आहे. डॉ. आंबेडकरांनी मुला–मुलींना शिक्षण देण्याच्या संदर्भात वारंवार आदेश केला होता. डॉ.आंबेडकरांनी सांगितले की, "तुम्ही आपल्या मुलींनाही शिक्षण दिले पाहिजे. ज्ञान आणि विद्या या गोष्टी काही पुरूषासांठीच नाही. त्या स्त्रियांनाही आवश्यक आहेत." तसेच बौध्द धम्मामध्ये स्त्री–पुरूष समता आहे. बौध्दाने स्त्रियांनादेखील धम्माचा उपदेश दिला. भिक्खुप्रमाणेच भिक्खुणींचादेखील संघ होता. डॉ.आंबेडकर आणि बौध्दधम्मामुळे बौध्दांमध्ये स्त्री–पुरूष समतेचा विचार रूजला. त्यामुळे मुलांप्रमाणेच मुलींनादेखील शिक्षण देण्यास सुरूवात केली. मुलांना शिक्षण द्यावे. मुलांना शिक्षण द्यावे. परंतु मुलींना शिक्षण नाही दिले तर हरकत नाही.असा विचार बौध्दांनी केला नाही. मुलींच्या व्यक्तिमत्वाच्या विकासाकरीता देखील शिक्षणाची आवश्यकता आहे. मुलींदेखील शिकल्या पाहिजेत असा विचार करून त्यांनी मुलींनादेखील प्राथमिक किंवा माध्यमिकच नव्हे तर उच्च शिक्षण दिले आहे. ग्रामीण लोक चांगले शिक्षण प्राप्त करू न शकल्यामुळे शेतीमध्ये वैज्ञानिक आधुनिक पध्दतीचा उपयोग न केल्यामुळे उत्पादकता उत्पादन वाढविण्यात असमर्थ ठरले यावर समोर जाऊन सुबहसिंह यादव म्हणतात की, "कसेही असले तरी आपल्या समोर आज आव्हान आहे की, या ग्रामीण क्षेत्रातील शिक्षण वाढीला प्राधान्य कसे द्यावे. कोणत्या पध्दतीचा अवलंब करावा हा प्रश्न आहे."

### मुल्यांकनः

धर्मांतरीता बौध्द कुटूंबातील उत्तरदात्याची शैक्षणिक स्थिती जाणून घेण्यात आली. कुटूंबातील सदस्यांनी जास्त शिक्षण न घेतल्याची कारणे, शिक्षणातून झालेल्या बदलाची स्थिती, स्त्रियांचे शिक्षण, इत्यांदीचा उलगडा करण्यात आला व शिक्षणातून विचारात, व्यक्तीमत्वात व सर्वांगीण विकासात होत असलेल्या बदलाचा आढावा घेण्यात आला.

### संदर्भ सूची

1. *शरयु अनंतराम, भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान. वडसे उमा, पॉप्युलर पॉप्युलर प्रकाशन मुंबई–1987,पृ.क्र.104*
2. *Maharashtra Govt. Dr. Ambedkar Writing and Speeches, Vol.2, Education Department-1982, P.No.62*
3. *महाराष्ट्र शासन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड–18 भाग–1, उच्च आणि तंत्र शिक्षण महाराष्ट्र शासन, पृ. क्र.523*
4. *शर्मा रामनाथ, शैक्षणिक समाजशास्त्र शर्मा राजेंद्रकुमार ॲटलांटिक पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स, नवी दिल्ली–1997,पृ. क्र.35*
5. *धनंजय किर (संपादक), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई–1980,पृ.क्र.03*
6. *भांडारकर पु.ल., भारतातील सामाजिक समस्या (संपादक– डॉ. विलास संगवे) पॉप्युलर प्रकाशन मुंबई–1979, पृ.क्र.287*
7. *शर्मा रामनाथ, शैक्षणिक समाजशास्त्र, शर्मा राजेंद्रकुमार, तत्रेंव, पृ.क्र. 92*
8. *नाटाणी शोभा, भारतीय समाज और नारीः दशा एवं दिशा पार्क पब्लिशर्स, जयपुर 2010, पृ.क्र.62*
9. *चौधरी नारायण सामाजिक परिवर्तनः प्रक्रिया व घटक जोशी विरोचन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक बापट जोत्सना, 2009, पृ.क्र.80*
10. *शरयू अनंतराम, सामाजिक संस्था, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,नागपुर विद्यापीठ नागपुर 1981,पृ.क्र.20*